| | |
|---|---|
| MHLA120005012026 | **नि.फौ.ख क्र.६२/२०२६ मधील निशाणी क्र.५ खालील आदेश.** <br> **(दि.१९/०६/२०२६)** |

अर्जदार शुभम विश्वजित सुर्यवंशी यांनी प्रस्तुतचा अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ५०३ अन्वये पोलीस निरीक्षक कार्यालय शिरुर अनंतपाळ यांनी गु.र.नं.२६३/२०२६ मधील जप्त केलेली हिरो कंपनीची HF DELUXE (डिआरएस) मोटारसायकल नोंदणी क्र.MH-24-BV-1636 परत मिळणेकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०२. अर्जदार असे कथन करतात की, ते मौजे कलांडी, ता. निलंगा, जि. लातूर येथील रहिवाशी आहेत. अर्जदार हे HF DELUXE नोंदणी क्र.MH-24-BV-1636 ज्याचा चेसी नं.MBLHAW289P5J01847 आणि इंजिन नं.HA11EP5J52502 असलेल्या या मोटारसायकलचे कायदेशीर नोंदणीकृत मालक आहेत. अर्जदार सदर मोटारसायकलचा वापर त्यांच्या व्यवसायासाठी जाण्यायेण्यासाठी वापर करतात. त्यामुळे अर्जदारास सदर वाहनाची अत्यंत आवश्यकता आहे. अर्जदाराने पोलीस निरीक्षक शिरुर अनंतपाळ यांच्याकडे मोटारसायकल सोडण्याची त्यांना विनंती केली असता संबंधित पोलीसांनी मा.न्यायालयाचा मोटारसायकल सोडण्याचा आदेश आणावा असे निर्देश दिले. सदर मोटारसायकल क्र.MH-24-BV-1636 च्या कागदपत्रांच्या आवश्यक प्रती अर्जासोबत दाखल केल्या आहेत. सध्या उन्हाळी दिवस असुन उन्हामुळे सदर वाहनाचे इंजिन खराब होण्याची शक्यता आहे. अर्जदार सदर प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत त्या वाहनात कोणताही बदल करणार नाही किंवा ते

विकणार नाही. तसेच न्यायालयाने घालून दिलेल्या अटींचे पालन करण्यास तयार आहे. त्यामुळे अर्जदारास सदरचे वाहन परत करण्यात यावे अशी ते विनंती करतात.

०३. तपासी अंमलदार यांनी नि.क्र.१० कडे त्यांचे म्हणणे दाखल करुन मा.कोर्टाचा निकाल लागेपर्यंत नमुद क्रमांकाची मोटारसायकल ही कोणासही विक्री करु नये. मा.न्यायालय अथवा पोलीस ज्यावेळी वाहन हजर करणेबाबत आदेश देतील त्यावेळी सरचे वाहन हजर ठेवावे. सदर प्रकरणातील कोर्टाचा निकाल लागेपर्यंत सदर वाहनाचा रंग अथवा इंजीन व चेसीजमध्ये अदलाबदल किंवा फेरफार करणार नाही. मुळ कागदपत्र मा.न्यायालयात सादर करावी या अटीवर परत करण्यास हरकत नाही असे कथन केले आहे. सरकारी वकीलांनी अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करुन उपरोक्त प्रकरणातील अर्जदाराची हिरो कंपनीची HF Delux मोटारसायकल क्र.MH-24-BV-1636 ही गु.र.नं.२६३/२०२६ मध्ये तपासी अधिकारी पोलीस स्टेशन शिरुर अनंतपाळ पोलीस ठाणे यांनी जप्त केलेली आहे. सदरील वाहन जर सुपूर्तनाम्यावर सोडले तर अर्जदार मोटारसायकलची विक्री तसेच मोटारसायकलच्या स्वरुपात बदल करण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात योग्य तो आदेश व्हावा अशी विनंती केली आहे.

०४. अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री.के.एस.घाडगे व सरकारी वकील श्री. एस.आर.कुलकर्णी यांचा युक्तीवाद ऐकला.

०५. अर्ज, म्हणणे, अभिलेख व दाखल कागदपत्र पाहिली. यावरुन असे दिसून येते की, अर्जदाराने त्याच्या अर्जाच्या पृष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.९ कडे

दाखल केले आहे. तसेच एफ.आय.आर. क्र.२६३/२०२६ ची प्रमाणीत प्रत, गाडीची आरसी बुक, विमा पॉलीसी व आधार कार्ड इत्यादी च्या व्हेरीफाईड प्रती अभिलेखावर दाखल आहेत. दाखल कागदपत्रांवरुन अर्जदार हे जप्त वाहन मालकीची HF DELUXE मोटारसायकल क्र.MH-24-BV-1636, चे मालक अर्जदार आहेत असे दिसून येते. तसेच प्रस्तुत वाहन जर का पोलीस स्टेशनमध्ये आहे त्या स्थितीमध्ये पडून राहिले तर त्या वाहनाचे इंजिन खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या पायरीवर जप्त वाहन त्याच्या मालकास काही अटींवर परत देणे उचित राहील.

०६. तपासकामी मुद्देमाल आवश्यक आहे असे पोलीसांचे म्हणणे नाही. सदर वाहन हे अर्जदाराच्या मालकीचे असल्याबाबत अभिलेखावर कागदपत्रे दाखल आहेत. तसेच सदरचे वाहन खालील अटी व शर्तीवर परत देणे योग्य वाटते. सबब, भारतीय नागरीक सुरक्षा संहीता कलम ५०३ अन्वये मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| ०१. | अर्ज मंजूर करणेत येतो. |
| ०२. | जप्त हिरो कंपनीची HF DELUXE (डिआरएस) मोटारसायकल नोंदणी क्र.MH-24-BV-1636 ज्याचा चेसी नं.MBLHAW289P5J01847 आणि इंजिन नं.HA11EP5J52502 याचा अंतरीम ताबा रक्कम रुपये ८०,०००/- च्या सुपूर्तनाम्यावर अर्जदार शुभम विश्वजित सुर्यवंशी यांना परत करण्यात यावी. |
| ०३. | अर्जदाराने जप्त वर नमुद वाहन त्याच्या ताब्यात मिळाल्यानंतर या केसचा अंतिम निकाल लागेपर्यंत ती कोणालाही विकू नये अथवा त्यामध्ये कोणताही बदल करु नये व सदर वाहनाची आवश्यकता असल्यास ती न्यायालयापुढे हजर करावी. |

| | |
|---|---|
| ०४. | तपासी अधिकारी यांनी सदरची जप्त HF DELUXE नोंदणी क्र.MH-24-BV-1636 ज्याचा चेसी नं.MBLHAW289P5J01847 आणि इंजिन नं.HA11EP5J52502 हे वाहन अर्जदारास परत करण्यापूर्वी या जप्त वाहनाची व्यवस्थीत ओळख पटण्यासाठी सर्व बाजूने फोटो काढून त्याबाबत पंचनामा करावा असा पंचनामा व फोटो त्यांचे निगेटीव्हसह तथा योग्य त्या प्रमाणपत्रासह न्यायालयात या आदेशापासून सात दिवसांच्या आत दाखल करावेत. या सर्व प्रक्रियेचा खर्च प्रस्तुत अर्जदाराने करावा व तसा अहवाल या न्यायालयात पाठविण्यात यावा. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
KOMAL PRAMOD
GADE
Date: 2026.06.19
17:26:38 +0530

दिनांक – १९/०६/२०२६.

**(श्रीमती के.पी.गाडे)**
प्रथवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्रं.२), निलंगा.